सिंचनात् राष्ट्रोद्धार :

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-४११ ०११

## नियामक मंडळाची १०३ वी बैठक
## दिनांक २७ जानेवारी २०२०

# ठराव

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

## ठराव

मा. ना. श्री. जयंत राजाराम पाटील, मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १०३ वी बैठक सोमवार दिनांक २७/०१/२०२० रोजी परिषद सभागृह क्र. २, ७वा मजला, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. जयंत राजाराम पाटील | ... | मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. मनोज सौनिक | | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य |
| ३. | मा. श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी | ... | प्रधान सचिव (वने) व सदस्य |
| ४. | मा. श्री. आय. एस. चहल | ... | प्रधान सचिव (जसप्र व वि) व सदस्य |
| ५. | मा. श्री. राजेंद्र पवार | ... | सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | मा. श्री. खलील अन्सारी | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजीव के. | ... | सचिव (व्यय), मंत्रालय, मुंबई<br>मा.अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. संजय बनकर | ... | उपसचिव (पुनर्वसन), मंत्रालय,मुंबई<br>सचिव (म. व पु.) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. वि.गि. राजपूत | ... | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे |
| २. | श्री. रा. द. मोहिते | ... | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे |
| २. | सुनंदा जगताप | ... | अधीक्षक अभियंता, मकृखोविम, पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

## ठराव

ठराव क्र. १०३/१

"ठराव करण्यात येतो की, दि. २४.०७.२०१९ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या १०१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाही अहवालाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

ठराव क्र. १०३/२

"ठराव करण्यात येतो की, दि. २९/०८/२०१९ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या १०२ व्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ठरावापैकी ठराव क्र. १०२/०२ बाबत ठराव पारित झालेला नसल्याने सदर ठराव वगळता उर्वरित ठराव क्र. १०२/१ व १०२/३ ते १०२/०९ कायम करण्यात आले."

ठराव क्र. १०३/३

"ठराव करण्यात येतो की, सन २०१८-१९ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेख्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/४

"ठराव करण्यांत येतो की, सन २०१९-२० या कालावधीसाठी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या भांडवली अर्थसंकल्पास मान्यता तसेच सदर अर्थसंकल्प राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीस सादर करण्याकरीता नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/५

"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. देवदु. २०१५/(८३६/२०१५)/सिं.व्य. (कामे), दि. १७-११-२०१६ नुसार दि. १५ ऑक्टोबर २०१९ चा पाणीसाठा विचारात घेऊन सिंचन व्यवस्थापनाचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील जमा व खर्चाचे रु. ३७२.२० कोटीचे अंदाजपत्रक अंतिम करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

ठराव क्र. १०३/६

"ठराव करण्यात येतो की, सोलापूर महानगरपालिकेस उजनी धरणातून पिण्यासाठी शिरापूर उपसा सिंचन योजनेद्वारे एकरुख तलावात पाणी सोडण्याच्या पूरक पर्यायी प्रस्तावास सदर कामासाठी येणारा खर्च इतर स्त्रोतामधून म्हणजे जिल्हा नियोजन निधी / C.S.R. निधी / महानगरपालिकेचा निधी अथवा इतर निधीतून करण्यास व पाणी उपसा करण्यासाठी दरवर्षी येणाऱ्या विद्युत देयक व देखभाल दुरूस्तीचा खर्च सोलापूर महानगरपालिकेने करणे या अटींच्या अधीन शासनाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/७

"ठराव करण्यात येतो की, मौजे सिद्धटेक, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथील भीमा नदीच्या जलाशयात व्यवसाय करण्याबाबत प्रस्तावित प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/८

"ठराव करण्यात येतो की, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील महामंडळाचे वकील पॅनलवर ॲड· श्री.दिनेश खैरे यांची करार तत्त्वावर नियुक्ती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/९

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा प्रकल्प - आरफळ कालवा कि. मी. ७७ ते ७८ मधील बोगदा लवाद कामातील ॲड. महेश ना. कुलकर्णी यांची उर्वरीत वकील फी रु.१७,४८,८७८/- अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१०

"ठराव करण्यात येतो की, गुंजवणी प्रकल्प, ता. वेल्हे, जि. पुणे संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १७९८/२०१८ व २१०१/२०१८ मध्ये न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ यांचे कडून नेमणूक करण्यात आलेल्या वरिष्ठ विधीज्ञ श्री. रफिक दादा यांच्या नियुक्तीस व विधी शुल्क व इतर शुल्कापोटी

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

त्यांना रु. ६,७५,०००/- (रु. सहा लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) अदा करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/११

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अखत्यारीतील बारामती शहरातील नीरा डावा कालवा कि.मी. ७७ लगतची सेवापथाकडील बारामती पाटबंधारे वसाहतीतील सर्व्हे नंबर २७७ मधील जागेच्या मालकी हक्कामध्ये बदल न करता जुन्या पाण्याच्या टाकीच्या ठिकाणी, आवश्यक ११ गुंठे जागेवर बारामती नगर परिषदेस नवीन पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१२

सदर बाबत यथावकाश निर्णय घेण्याचे ठरल्यामुळे याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

ठराव क्र. १०३/१३

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम १९९६ मधील प्रकरण ५ कलम २८ मधील तरतूदीनुसार महामंडळाच्या अखत्यारीतील नीरा उजवा कालवा किमी ४२/८०० मधील सेवापथाकडील १ हे. जागा चौधरीवाडी नळ पाणी पुरवठा योजनेसाठी (ता.फलटण,जि.सातारा) ग्रामपंचायत मौजे चौधरीवाडी यांना साठवण तलाव व जलशुद्धीकरण केंद्रासाठी नाममात्र भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१४

"ठराव करण्यात येतो की, ग्रामपंचायत, नारायणगाव ता. जुन्नर यांना सार्वजनिक नळपाणीपुरवठा पाणी टाकी बांधकाम व जलशुद्धीकरण केंद्रासाठी कुकडी वसाहत, नारायणगाव येथील मोकळी जागा ०.४० हे. महामंडळाचे नियामक मंडळाच्या ९९ व्या बैठकीत दिनांक १३.०२.२०१९ रोजी ठराव क्र ९९/१५ नुसार देण्यात आलेली आहे. सदरच्या जागेची रक्कम रू.५१.५० लक्ष पैकी प्रथम रू. १५.०० लक्ष व उर्वरीत रू. ३६.५० लक्ष दिनांक ३१.३.२०२० पुर्वी महामंडळाकडे जमा करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

ठराव क्र. १०३/१५

"ठराव करण्यात येतो की, धामणी मध्यम प्रकल्प,ता.राधानगरी,जि.कोल्हापूर या प्रकल्पाच्या धरण, सांडवा व सिंचन तथा विद्युत विमोचक कामाच्या वाणिज्यिक न्यायालयाच्या आदेशानुसार प्रलंबीत दायित्वाची रक्कम रू. १०५.९३ कोटी अदायगीच्या प्रलंबित दायित्वास न्यायप्रविष्ठ प्रकरणातील अपरिहार्यता (Fait accompli) म्हणून शासन मान्यतेची वाट न पहाता नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१६

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील प्रकल्पांच्या निविदांतर्गत निर्माण होणाऱ्या कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या निविदेतर्गत रु. ६५४.१६ लक्ष चे दायित्वास शासन निर्णय निविदा १२१३/(७३५/१२)/मोप्र-१, दि. २२-१२-२०१७ नुसार नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१७

सदर बाबत यथावकाश निर्णय घेण्याचे ठरल्यामुळे याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

ठराव क्र. १०३/१८

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांची संख्या विचारात घेता त्यांचा त्वरेने व विहीत कालावधीत योग्य पद्धतीने निपटारा करणे, भूसंपादन व पुनर्वसन विषयक बाबी हाताळणे यासाठी अनुभवी उपअभियंत्याची आवश्यकता असल्याने, तसेच दि. ०९/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अद्याप महामंडळात उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यात आलेली नसल्याने या कामांचा अनुभव असलेले सेवानिवृत्त उप विभागीय अभियंता श्री. राजीव लक्ष्मीकांत भोपळे यांच्या शासन निर्णय दि. १७ डिसेंबर २०१६ नुसार करार पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी केलेल्या नियुक्तीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

२०१६ नुसार करार पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी केलेल्या नियुक्तीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/१९

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या बैठका व दैनंदिन महामंडळाकडील कामकाज नियमित ठेवण्याच्यादृष्टीने अनुभवी कर्मचाऱ्याची आवश्यकता असल्याने या कामांचा प्रदीर्घ अनुभव असलेले श्री. शां. मो. खोल्लम, सेवानिवृत्त निम्नश्रेणी लघुलेखक (गट ब-अराजपत्रीत) यांच्या शासन निर्णय दि. १७ डिसेंबर २०१६ नुसार करार पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी केलेल्या नियुक्तीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/२०

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या ताकारी उपसा सिंचन योजनेअंतर्गत वाळवा तालुक्यातील दुधारी, रेठरे हरणाक्ष व भवानीनगर या गावातील अतिरिक्त २७४.६४ हे. तसेच चतुर्थ सु.प्र.मा. अहवालात समाविष्ट नसलेल्या येडे मच्छिंद्रे, लवणमाची व किल्ले मच्छिंद्रगड या सिंचनापासून वंचित असलेल्या गावातील ३०० हे. क्षेत्र असे एकुण ५७४.६४ हे. क्षेत्रास ताकारी टप्पा क्र.२ मधून गुरुत्विय पद्धतीने बंदिस्त नलिकाप्रणालीद्वारे पाणी देण्याच्या रु. २३ कोटी (सन २०१८-१९ च्या दरसुचीनुसार) प्रस्तावास तत्वत: मान्यता आहे. सदरचे अतिरिक्त क्षेत्र प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट करुन सदर प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या व इतर घटक कामाच्या खर्चामधून होणाऱ्या संभाव्य बचतीतून सिंचन सुविधा पुरविण्याचे काम करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०३/२१

"ठराव करण्यात येतो की, रहिमतपुर नगरपरिषद ता. कोरेगांव जि. सातारा यांनी मागणी केलेले सर्वे नं. २३२ क्षेत्र ३ हेक्टर ४० आर पैकी नगरपरिषद आरक्षण क्र. ९४ बहुउद्देशीय सभागृहासाठी आरक्षीत असलेले क्षेत्र १ हे. ११ आर (११,१०० चौ.मी.) व या आरक्षणाचे उपरोक्त असणारे ०.७७ हेक्टर (७,७०० चौ.मी.) क्षेत्र असे एकुण १.८८ हेक्टर (१८,८०० चौ.मी.) क्षेत्र, यापुर्वी जलसंपदा विभागाव्दारे प्रस्तावित केलेले प्रशिक्षण केंद्र, सद्यस्थितीत बांधणेचे कोणतेही नियोजन नसलेने सदर जागेचे मूल्य रु. ३.०० कोटी इतके भरण्यास रहिमतपूर नगरपरिषद तयार असल्यास खालील 'अटी' अधीन त्याबाबत शासन / महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यास कार्यकारी संचालक यांना अधिकार देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२०

अट :

१. हस्तांतरण करण्यात येणारे क्षेत्र वगळुन उर्वरीत क्षेत्रास चारी बाजुंनी संरक्षक भिंत रहिमतपुर नगरपरिषदेने बांधुन द्यावी किंवा त्यासाठी आवश्यक निधी महामंडळास उपलब्ध करुन द्यावा.

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

(इंजि. खलील अन्सारी)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(जयंत राजाराम पाटील)
मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे